महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक: **एमआयएस**-०१२२/सीआर-२१/२०२५/तेरा दिनांक :- १८ फेब्रुवारी, २०२६

## -:प्रसिद्धीपत्रक:-

विषय :- महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२५
संदर्भ :- आयोगाचे क्रमांक एमआयएस -०१२०/सीआर-२२/२०२३/मा.तं, दिनांक ३ ऑक्टोबर, २०२५ रोजीचे प्रसिद्धीपत्रक

शासन सेवेतील विविध अराजपत्रित संवर्गातील पदभरतीकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून दिनांक २९ जुलै, २०२५ रोजी प्रसिद्ध जाहिरातीस अनुसरून (जा. क्र. ११७/२०२५) महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२५ करिता आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे विहित मुदतीमध्ये व विहित पद्धतीने अर्ज सादर केलेल्या उमेदवारांपैकी दिव्यांग, खेळाडू व अनाथ आरक्षणाचा दावा केलेल्या उमेदवारांनी दाव्यांपुष्ट्यर्थ अपलोड केलेली प्रमाणपत्रे/कागदपत्रे यांची छाननी करण्याची कार्यवाही आयोगामार्फत सुरू आहे. सदर छाननीच्या वेळी जाहिरातीतील तरतुदींनुसार तसेच अर्जासोबत प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर करण्यासंदर्भातील आयोगाच्या संदर्भिय दिनांक ३ ऑक्टोबर, २०२५ रोजीच्या प्रसिद्धीपत्रकामध्ये नमूद कार्यपद्धतीनुसार सक्षम प्राधिका-यांनी प्रदान केलेली तसेच वैध प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर न केलेल्या उमेदवारांना प्रमाणपत्रे/कागदपत्रे पुन्हा अपलोड करण्याकरीता एक संधी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने आयोगाच्या https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावरील उमेदवारांच्या प्रोफाईल मधील 'My Account' मध्ये संबंधित उमेदवारांना आवश्यक प्रमाणपत्रे/कागदपत्रे अपलोड करण्यासाठी सुविधा/लिंक उपलब्ध करून देण्यात येत आहे.

२. उपरोक्तप्रमाणे प्रोफाईलमध्ये सुविधा/लिंक उपलब्ध करून देण्यात आलेल्या उमेदवारांनी सदर सुविधा/लिंकद्वारे दिव्यांग, खेळाडू व अनाथ आरक्षणाच्या दाव्यांच्या अनुषंगाने (लागू असेल त्याप्रमाणे) संदर्भिय दिनांक ३ ऑक्टोबर, २०२५ रोजीच्या प्रसिद्धीपत्रकात नमूद केल्याप्रमाणे वैध/विहित प्रमाणपत्रे/कागदपत्रे अपलोड करणे अनिवार्य राहील.

३. विहित कालावधीमध्ये वैध प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर न केल्यास संबंधित दाव्यांचा विषयांकित परीक्षेच्या भरतीप्रक्रियेकरीता विचार केला जाणार नाही.

४. अर्जासोबत दिव्यांग, खेळाडू व अनाथ आरक्षणाच्या दाव्यांच्या अनुषंगाने वैध प्रमाणपत्रे/कागदपत्रे अपलोड न केलेल्या उमेदवारांनी प्रस्तुत प्रसिद्धीपत्रकास अनुसरुन उपलब्ध सुविधा/लिंकद्वारे दिनांक १८ फेब्रुवारी, २०२६ रोजी १२.०० ते दिनांक २४ फेब्रुवारी, २०२६ रोजी २३.५९ वाजेपर्यंत वैध प्रमाणपत्र/कागदपत्र अपलोड करणे आवश्यक आहे. वैध प्रमाणपत्र/कागदपत्र अपलोड केलेल्या उमेदवारांकडून कोणत्याही कार्यवाहीची आवश्यकता नाही.

५. आयोगाकडून वैध प्रमाणपत्र/पुरावा अपलोड करण्यासाठी संधी दिलेल्या उमेदवारांनी विहित कालावधीमध्ये तसेच विहित पद्धतीने अपलोड केलेल्या प्रमाणपत्र/पुराव्यांची पडताळणी/तपासणी पुन्हा प्रचलित पद्धतीनुसार करण्यात येईल व त्याच्या आधारे उमेदवारांच्या दाव्यांची वैधता निश्चित करण्यात येईल.

६. वरील पद्धतीनुसार प्रमाणपत्र/पुराव्यांची पडताळणी/तपासणी झाल्यानंतर उमेदवारांचे दावे अंतिम होतील व ते पुढील प्रक्रियेसाठी ग्राह्य धरण्यात येतील.

सुनिल अवताडे
सह सचिव, परीक्षा पूर्व
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण : नवी मुंबई